महाराष्ट्र टाइम्स 27-12-2021

# सहकारी संस्थांचा 'डेटाबेस'

## विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी होणार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

सहकारी संस्थांचा एकत्रित राष्ट्रीय डेटा गोळा करण्याच्या संदर्भात केंद्राने विविध तज्ज्ञांशी चर्चा सुरू केली असून, सहकारक्षेत्रामध्ये केंद्र आणि राज्य सरकार राबवित असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी यामुळे अधिक प्रभावीपणे होणार आहे. याद्वारे सुशासनास चालना मिळेल, असे सांगितले जात आहे.

सहकार सचिव डी. के. सिंह यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक झाली. सहकारी संस्थांसह, रिझर्व्ह बँक, नाबार्ड, 'आयआरएमए' यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते. याखेरीज केंद्र आणि राज्य सरकारांचे अधिकारीही उपस्थित होते. सहकार मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले, की सहकारी संस्थांच्या राष्ट्रीय डेटाबेसचे सर्वांनी स्वागत केले. सहकार क्षेत्रातील हे महत्त्वाचे धोरण असेल. केंद्र आणि राज्य सरकार सहकार क्षेत्रासाठी विविध योजना राबवित असले, तरी त्याबाबतील संपूर्ण डेटा आज उपलब्ध नाही. संबंधित घटकांना हा डेटा देण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबत सल्ले देण्यासही संबंधित घटकांना सांगण्यात आले आहे.

### 'डेटाबेस'चे फायदे काय?

- सहकार क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान समजण्यास मदत.
- पाच ट्रिलियन अमेरिकी डॉलरचे लक्ष्य गाठण्यासाठी मदत
- भिन्न क्षेत्रांतील आणि सहकार क्षेत्रांतील गुंतवणुकीस चालना. स्टार्ट-अप्स वाढण्याची शक्यता
- 'नॅशनल को ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया'कडे साडेआठ लाख संस्थांची सध्या माहिती
- साडेआठ लाखपैकी वीस टक्के 'क्रेडिट सहकारी' आणि उर्वरित ८० टक्के 'नॉन क्रेडिट' सहकारी
- राज्यांतील सहकारी संस्था संबंधित राज्यांच्या सहकार कायद्यानुसार चालतात, तर आंतरराज्य संस्था 'एमएससीएस'अंतर्गत चालतात.